# अवघे शहर शिवमय

## विविध उपक्रमांच्या आयोजनातून शिवजयंती उत्साहात साजरी

कोल्हापूर टाइम्स टीम

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शहरातील विविध शैक्षणिक संस्था, सामाजिक व स्वयंसेवी संस्था, संघटना, राजकीय पक्ष यांच्यावतीने बुधवारी शिवजयंती उत्सव साजरा करण्यात आला. शिवकालीन इतिहासावरील मनोगत, व्याख्याने, स्पर्धा या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

### विद्यापीठात झांजपथकाचा घुमला आवाज

शिवाजी विद्यापीठात सकाळी साडेआठ वाजता कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते विद्यापीठ ध्वजास वंदन करण्यात आले. तत्पूर्वी, त्यांच्यासह मान्यवरांनी शिवप्रतिमेचे पूजन केले. ध्वजवंदनानंतर राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीत सादर करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी भवनच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या झांज, ढोलताशा व लेझीम पथकांनी या वेळी मान्यवरांसमोर नेत्रदीपक सादरीकरण करून वातावरणात रंग भरला. त्यानंतर मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य पुतळ्याला पुष्प वाहून अभिवादन केले.

या वेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे, संचालक डॉ. आर. के. कामत, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या समन्वयक डॉ. नमिता खोत यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय सेवक, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जिल्हा प्रशासन

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा प्रशासनाच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयातील छत्रपती शिवाजी सभागृहात जिल्हाधिकारी दौलत देसाई यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी निवासी उपजिल्हाधिकारी भाऊसाहेब गलांडे, उपजिल्हाधिकारी (महसूल) श्रावण क्षीरसागर, निवडणूक उपजिल्हाधिकारी सतीश धुमाळ, करवीरचे उपविभागीय अधिकारी वैभव नावडकर, तहसीलदार सुनीता नेर्लीकर, रंजना बिचकर, सविता कापसे, नायब तहसीलदार प्रकाश दगडे, अनंत गुरव यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### महापालिकेतर्फे अभिवादन

महापालिकेतर्फे राजर्षि छत्रपती शाहू सभागृहातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास महापौर निलोफर आजरेकर यांनी पुष्पहार अर्पण केला. या वेळी आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, नगरसेवक अशोक जाधव, अतिरिक्त आयुक्त नितीन देसाई, शहर अभियंता नेत्रदिपक सरनोबत, नगरसचिव दिवाकर कारंडे, उपशहर अभियंता रावसाहेब चव्हाण उपस्थित होते.



शिवजयंतीनिमित्त छत्रपती शिवरायांना अभिवादन करताना महापौर निलोफर आजरेकर, आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, नितीन देसाई, नेत्रदिप सरनोबत, दिवाकर कारंडे.

### जिल्हा बँकेत अभिवादन

कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेत संचालक आर. के. पोवार, अनिल पाटील, उदयानी साळुंखे यांच्या हस्ते शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. बँकेचे पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### जिल्हा कॉंग्रेस कमिटी

कोल्हापूर जिल्हा कॉंग्रेस कमिटीमध्ये शहर व जिल्हा कॉंग्रेस कमिटीच्या वतीने पालकमंत्री सतेज पाटील यांच्या हस्ते छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या वेळी शहराध्यक्ष प्रल्हाद चव्हाण, जि. प. अध्यक्ष बजरंग पाटील, महापौर निलोफर आजरेकर, उपमहापौर संजय मोहिते, संपतराव चव्हाण पाटील, ॲड. गुलाबराव घोरपडे, ॲड. सुरेश कुराडे, जिल्हा सचिव संजय पवार (वाईकर), प्रदेश चिटणीस तौफिक मुल्लाणी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

### रंकाळा स्वच्छता

रंकाळा संवर्धन परिवार व स्वामी विवेकानंद एज्युकेशन ॲकेडमी यांच्यावतीने शिवजयंतीनिमित्त रंकाळा स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. तसेच, ॲकेडमीच्या विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्व विकास या विषयावर कृपाल यादव यांनी मार्गदर्शन केले. या वेळी ऋषीराज जाधव, राम नाईक, शिवकुमार पोवार, योगेश सावंत, अभिजीत दुर्गुळे, शुभम पाटील उपस्थित होते.

### रक्तदान शिबिराचे आयोजन

माने पार्क, सरनोबतवाडी येथे शिवजयंतीनिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. गांधीनगर पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक प्रदीप भांडवलकर यांची विशेष उपस्थिती होती. शिबिराचे 'जीवनधारा' ब्लड बँक, वैभव कांबळे, प्रसाद साळवी, ब्रिजेश वैष्णाणी, प्रदीप गाडेकर, कोमल कांबळे, विवेक ढेकळे व मोरया फ्रेन्ड्स ग्रुप यांनी यशस्वी आयोजन केले.

### आर्यक्षत्रीय समाज

आर्य क्षत्रिय समाजाच्यावतीने शिवपुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. या वेळी समाजाचे अध्यक्ष सतीश करजगार, उपाध्यक्ष नागेश गवळी, माजी अध्यक्ष व विद्यमान ट्रस्टी भानुदास सुर्यवंशी, उमेश बुधले, बाळकृष्ण सुर्यवंशी, गणेश चव्हाण, मनिष माने, नेहा चव्हाण आदी उपस्थित होते.

### वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

करवीर तालुक्यातील कोपार्डे येथील स. ब. खाडे महाविद्यालयात प्रतिमापूजन, पोवाडा गायनासह वक्तृत्व स्पर्धा घेऊन शिवजयंती आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. डी. कुरळपकर होते. अश्विनी म्हामुलकर आणि सहकाऱ्यांनी 'प्रतापगडचा संग्राम' हा पोवाडा सादर केला. शिवचरित्रावर आधारित वक्तृत्व स्पर्धेत अश्विनी पाटील हिने प्रथम, रसिका पाटील हिने द्वितीय तर प्रियांका पाटील हिने तृतीय क्रमांक मिळवला. सोनाली पाटील आणि सायली पाटील यांना उत्तेजनार्थ क्रमांक देण्यात आला.

### मिलिंद हायस्कूल

शाहूनगर येथील मिलिंद हायस्कूल येथे मुख्याध्यापक एम. एम. शिर्के यांच्याहस्ते शिवप्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. जे. जी. कदम यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांची युद्धनीती व सामाजिक कार्य या विषयावर मार्गदर्शन केले. या वेळी बी. एस. नदाफ यांनी निवेदन केले व एस. एन. दिंडे यांनी आभार मानले.

### बहुजन परिवर्तन संघटना

बहुजन परिवर्तन संघटनेतर्फे टाउन हॉल गार्डनमधील शिवपुतळ्यास ॲड. धनंजय पठाडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. या वेळी पोलिस निरीक्षक वसंतराव बाबर, पृथ्वीराज पठाडे, परिवर्तनचे अमोल कुरणे, इर्शाद मुल्ला, युनिस पटवेगार, अभिजित कदम, शरद कांबळे, अक्षय साळवे, बाळासाहेब साळवी, महादेव विभुते आदी उपस्थित होते.

### महात्मा फुले हायस्कूल

लक्षतीर्थ वसाहत येथील महात्मा फुले हायस्कूल येथे शिवजयंतीनिमित्त विद्यार्थ्यांनी शिवरायांच्या पराक्रमावर आधारीत पोवाडे सादर केले. या वेळी मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित होते.

### धरणग्रस्तांचे अभिवादन

जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करत असलेल्या चांदोली अभयारण्यग्रस्त व वारणा धरणग्रस्तांनी शिवप्रतिमेचे पूजन केले.

### सोनवणे हायस्कूल

मार्केटयार्ड परिसरातील सुनीतादेवी सोनवणे ज्ञानगंगा हायस्कूलमध्ये शिवजयंतीनिमित्त विद्यार्थ्यांच्या हस्ते शिवप्रतिमा पूजन करण्यात आले. सागर आळवेकर यांनी शिवरायांच्या जीवनातील प्रसंगावर कथन केले.

### स्वच्छता मोहीम

शिवजयंती उत्सवानिमित्त मंगळवारी शिवाजी पेठ येथील उभा मारुती चौक ते निवृत्त चौक रस्त्यासह परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. नगरसेवक अजित राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली मोहीम राबवण्यात आली. या वेळी शिवाजी तरुण मंडळाचे अध्यक्ष सुजीत चव्हाण, सुरेश जरग, उत्सव समितीचे अध्यक्ष रोहित मोरे, निखील कोराणे, अभिजित कडोलकर आदी उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठात झांज, ढोलताशा व लेझीम पथकांनी नेत्रदीपक सादरीकरण केले.

# शिवाजी विद्यापीठात सोमवारपासून 'कार्निव्हल'

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागातर्फे सोमवारी (दि. २४ ) आणि मंगळवारी (दि. २५) 'कार्निव्हल' होणार आहे. त्याअंतर्गत सोमवारी सकाळी १० ते १२ या वेळेत ओरिगामी कार्यशाळा होणार आहे. त्यात चित्रकार अर्चना देसाई या ओरिगामी प्रात्यक्षिके सादर करणार आहेत. यावेळी विविध कागदी कलावस्तू बनविण्याचे कौशल्य शिकविले जाईल. कार्यशाळेसाठी सर्वांना मोफत प्रवेश आहे. नावनोंदणीसाठी इच्छुकांनी विदेशी भाषा विभागाशी संपर्क साधावा. मंगळवारी दुपारी १२ ते ४ पर्यंत रशियन, जपानी, जर्मन, पोर्तुगीज संस्कृतीशी संबंधित कलावस्तू, ओरिगामी कार्यशाळेत निर्मिती केलेल्या वस्तूंचे प्रदर्शन आयोजित केले आहे. हे कार्यक्रम विद्यापीठातील वि. स. खांडेकर भाषा भवनमध्ये होणार आहेत.

# विद्यापीठात आज शिबिराचा समारोप

कोल्हापूर : राज्य सांस्कृतिक संचालनालय व शिवाजी विद्यापीठातील अण्णा भाऊ साठे अध्यासनाच्यावतीने आयोजित शाहिरी प्रशिक्षण शिबिराचा समारोप व प्रमाणपत्र वितरण गुरुवारी (ता. २०) होत आहे. यावेळी शाहीर डॉ. राजू राऊत 'थाप डफावर मार शाहिरा' हा कार्यक्रम सादर करणार आहेत. शिवाजी विद्यापीठातील भाषा भवनात दुपारी १२ वाजता हा कार्यक्रम होणार आहे. शिबिरार्थींना प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे.

# मातृभाषा दिनानिमित्त आज व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागातर्फे मातृभाषा दिनानिमित्त आज (ता. २०) व्याख्यानाचे आयोजन केले आहे. लेखक कृष्णात खोत व लोकसाहित्याचे अभ्यासक विष्णू वासुदेव यांचे मराठी भाषेचे आविष्कार या विषयावर व्याख्यान होणार आहे. मराठी विभागात दुपारी अडीच वाजता हे व्याख्यान होणार आहे अशी माहिती विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी दिली.


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 FEB 2020
तरूण भारत

# विद्यापीठाच्या शिरपेचात वाङ्मय पुरस्काराने मानाचा तुरा

प्रतिनिधी
कोल्हापूर

डॉ. मेधा पानसरे आणि किरण गुरव यांच्या साहित्यकृतींना महाराष्ट्र शासनाचे वाङ्मय पुरस्कार एकाचवेळी मिळाले. यामुळे शिवाजी विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केली.

महाराष्ट्र शासनाचे उत्कृष्ट मराठी वाङ्मय निर्मितीसाठी देण्यात येणाऱ्या यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार-२०१८ डॉ. मेधा पानसरे, किरण गुरव यांना जाहीर झाले. यानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या वतीने या दोघांचाही सत्कार करण्यात आला. यावेळी कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, विद्यापीठातील दोन सहकाऱ्यांना एकाच वेळी राज्यस्तरीय प्रतिष्ठेचा पुरस्कार प्राप्त होण्याला विशेष महत्त्व आहे. साहित्यिक अभिव्यक्तीच्या बाबतीत शिवाजी विद्यापीठातील शिक्षक आणि प्रशासकीय सेवक या दोन्ही स्तरांवरील सजगता यातून अधोरेखित होते. डॉ. पानसरे यांनी मराठी आणि रशियन या दोन भाषांच्या दरम्यान संवादाचा पूल उभारण्याची मोलाची कामगिरी केली आहे. त्याबद्दल त्यांचा राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठा गौरवही झाला आहे. त्याप्रमाणे प्रशासकीय जबाबदारी सांभाळत असताना आपला वेळ लेखन अभिव्यक्तीच्या



कामी सत्कारणी लावून किरण गुरव यांनीही मराठी साहित्य क्षेत्रात स्वतःची ओळख निर्माण केल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले.

प्र - कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, लेखनासारख्या सर्जनशील प्रांतामध्ये विद्यापीठातील सहकारी दमदार आणि लक्षणीय कामगिरी करीत आहेत, ही बाब कौतुकास्पद आहे. त्यांच्या या लेखनकार्याची शासन स्तरावरुन दखल घेतली जाणे, हे त्याहून अधिक गौरवास्पद आहे. विद्यापीठातील अन्य शिक्षक, सेवक यांच्यासाठी सुद्धा ही बाब आदर्शवत स्वरुपाची असून त्यांनीही आपल्यातील सर्जनशीलतेला वाव देण्याची गरज आहे.

जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी स्वागत केले. यावेळी वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे, अधिष्ठाता डॉ. भारती पाटील, उपकुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

आदर यांना जाती-धर्माची सीमा नाही की, भाषा संस्कृतीचे बंधन. सर्वधर्मीय मावळ्यांना घेऊन त्यांनी स्वराज्य स्थापन केले. अशा या द्रष्ट्या राजाला बुधवारी छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेडच्यावतीने मानाचा मुजरा केला. मुस्लिम बांधवांच्या पारंपरिक करबला पथकाचा ताल, वाद्यांचा गजर आणि महाराजांच्या तोफखान्याची शान असलेले सिद्धी

वाय. पी. पोवारनगर येथे महापौर निलोफर आजरेकर यांच्या हस्ते मिरवणुकीचे उद्घाटन झाले. यावेळी मराठा

मुस्लिम बांधवांच्या करबला या पारंपरिक वाद्यपथकाच्या तालबद्ध नृत्याने मिरवणुकीला सुरुवात झाली. शिवाजी महाराजांचा सर्वधर्म समानतेचा संदेश देत मिरवणुकीत शिवाजी महाराज आणि तोफेसोबत सिद्धी इब्राहीम खान असा सजीव देखावा साकारला. यावेळी नागरिक व कार्यकर्ते भगवे फेटे घालून सहभागी झाले होते.



शिवाजी विद्यापीठात बुधवारी शिवजयंतीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, आदींनी अभिवादन केले.

# विद्यापीठात शिवरायांचा जयजयकार

## विद्यार्थ्यांत शिवजल्लोष : पारंपरिक वाद्यांनी भरला अनोखा रंग

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** छत्रपती शिवाजी महाराज यांचा जयजयकार, पारंपरिक वाद्यांचा दणदणाट, अशा उत्साही वातावरणात शिवाजी विद्यापीठात बुधवारी शिवजयंती साजरी केली.

विद्यापीठात सकाळी साडेआठ वाजता कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते विद्यापीठ ध्वजास वंदन करण्यात आले. त्यापूर्वी शिवप्रतिमेचे पूजन केले. ध्वजवंदनानंतर राष्ट्रगीत, महाराष्ट्रगीत सादर केले. राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) आणि विद्यार्थी भवनच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या झांज, ढोलताशा, लेझीम पथकांनी यावेळी नेत्रदीपक सादरीकरण करून वातावरणात रंग भरला. त्यानंतर मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य पुतळ्याला पुष्प वाहून अभिवादन केले.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे, अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, ए. एम. गुरव, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. अभय जायभाये, क्रीडा अधिविभाग प्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, आयक्यूएसी संचालक डॉ. आर. के. कामत, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या समन्वयक डॉ. नमिता खोत उपस्थित होत्या.